आक्षेपांचे निराकरण व अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक : वेपूर-१९९३/प्र.क्र.६२/सेवा-१०,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १३ डिसेंबर, १९९३

पहा :- १] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०९०/प्र.क्र.३२/सेवा-१०, दिनांक २० जुलै, १९९०.
२] शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१९९२/प्र.क्र.५१/सेवा-१०, दिनांक २० ऑगस्ट, १९९२

प रि प त्र क

शासकीय कर्मचारी आणि इतर यांच्या वेतननिश्चितीची पडताळणी करतांना एखाधा प्रकरणी वेतन पडताळणी पथकाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण, संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्याकडून, असे आक्षेप प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये करण्यात यावे अशा सूचना वर नमूद केलेल्या शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०९०/प्र.क्र.३२/सेवा-१०, दिनांक २० जुलै, १९९० व शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक वेपुर-१९९२/प्र.क्र.५१/सेवा-१०, दिनांक २० ऑगस्ट, १९९२ नुसार निर्गमित करण्यात आल्या आहेत. आक्षेपाधिन प्रकरणांचा आढावा घेतला असता, अशा आक्षेपांचे निराकरण तसेच अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. परिणामी काही कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे निकालात काढण्यास विलंब होत असून उशिरा प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती विषयक लाभांच्या रकमेवर शासनास व्याजापोटी जादा खर्च सोसावा लागतो. तसेच अतिप्रदानाच्या रकमाही वेळेवर वसूल होत नसल्यामुळे त्यांचा वेळच्या वेळी शासकीय कोषागारात भरणा होत नाही.

२. सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचे लक्ष पुन्हा एकदा शासनाच्या वर नमूद केलेल्या दिनांक २० जुलै, १९९० व २० ऑगस्ट, १९९२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे आणि त्यांना विनंती करण्यात येते की, त्यात सूचना दिल्याप्रमाणे दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून अंमलात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीमधील वेतननिश्चितीची पडताळणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतन पडताळणी पथकाकडून जर काही आक्षेप घेण्यात आले असतील तर त्यांचे निराकरण वर नमूद केलेल्या परिपत्रकांतील सुचनांनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये करावे. कोणत्याही प्रकरणी वेतननिश्चितीबाबतच्या आक्षेपांचे निराकरण न केल्याची बाब कर्मचाऱ्यास हानीकारक ठरणार नाही याची संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय

प्रमुख यांनी काळजी घ्यावी.

३. माहे ऑगस्ट, ९३ च्या वेतन पडताळणी पथकाच्या मासिक प्रगती अहवालात असे आढळले आहे की, ४०७१ प्रकरणांत अतिप्रदान रकमेची वसुली निर्देशित केली असून वसुलीची अंदाजित रक्कम रु.७८,८३,०००/- अशी आहे. वसुली विहित कालावधीत करावी या विषयी सर्व शासकीय कार्यालयांत एकसूत्रता असावी, यास्तव शासन आता असे निदेश देत आहे की, अतिप्रदान झालेल्या प्रकरणांतील वसुली वेतन पडताळणी पथकांनी अशी बाब निदर्शनास आणल्यावर लगेचच संबंधित कर्मचा-यांकडून, त्याच्या मूळ वेतनाच्या २० टक्के रकमे इतक्या सुसह्य मासिक हप्त्यात वसूल करण्याची काळजी घ्यावी. शासन असाही आदेश देत आहे की, आक्षेपांचे निराकरण करण्याच्या कामी विलंब झाल्यास तसेच अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली वेळेवर न करण्यात आल्यास, त्याची जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरुध्द आवश्यक ती कार्यवाही, संबंधित प्रशासकीय विभागाने करावी व यावर नियंत्रण ठेवण्याकरीता प्रशासकीय विभाग/विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख यांनी वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकांत स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या वार्षिक प्रशासकीय तपासणीत याबाबतचा सखोल आढावा घ्यावा.

६. हे आदेश जिल्हा परिषद कार्यालयांनाही योग्य त्या फेरफारांसह लागू आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
का. अ. वाघमारे,
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

खेडेकर८.२.